# पुणे विद्यापीठ

परीक्षा विभाग

दूरध्वनी क्र.०२०–२५६०१२०४
इंजि.– २५६०१२११
मॅनेज/लॉ/शि.शा. .–२५६०१२१६
आर्टस.– २५६०१२१३
सायन्स.– २५६०१२१४/कॉमर्स–२५६०१२१५
फार्मसी/मेडिकल–२५६०१२२०

टेलिग्राफ : "युनिपुणे"
फॅक्स –०२०–२५६०१२०८
फॅक्स –०२०–२५६०१२०४

वेबसाईट:www.unipune.ac.in
ई.मेल coe@unipune.ernet.in

---

जा.क्र./mgnt /११६०

दिनांक: ०७ एप्रिल,२०१२

## सूचनापत्र

या सूचनापत्राव्दारे सर्व सबंधित संलग्न महाविद्यालये / संस्था यांना कळविण्यात येत आहे की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाचे कामकाज आधुनिक पध्दतीने, तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्याचे सुरु केलेले आहे. परीक्षा विभागाचे कामकाज सुध्दा तंत्रज्ञानाच्यासहाय्याने करण्यात येत आहे. विविध परीक्षांचे वेळापत्रके,नेमलिस्ट,समरी,हॉल तिकीट, निकाल, पास लिस्ट विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

कोणतीही परीक्षा सुरू होण्यापूर्वी काही दिवस अगोदर संबंधित परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची नेमलिस्ट,समरी, हॉल तिकीट, संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जाईल. नेमलिस्ट, समरी, हॉलतिकीट यामध्ये काही त्रुटी असतील अथवा चुका असतील तर संकेतस्थळावर उपलब्ध झालेल्या दिवसापासून दोन दिवसाचे आत मा. प्राचार्यामार्फत / मा. संचालकांमार्फत योग्य त्या कागदपत्रासह व माहितीसह संबंधित महाविद्यालय अथवा संस्थेच्या सक्षम अधिका–यासोबत परीक्षाविभागात पाठवावे. दोन दिवसात परीक्षा विभागात प्रत्यक्ष येणे शक्य नसेल तर सदर त्रुटी संदर्भातील माहिती विद्यापीठाच्या ई मेल ॲडरेसवर (coe@unipune.ac.in ) पाठवावी. सदर त्रुटी संदर्भात परीक्षाविभागाकडून त्वरीत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. त्रुटी संदर्भातील माहिती दोन दिवसात परीक्षाविभागाकडे पोहचू शकली नाही तर विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही बाब संबंधितांनी गंभीरतेने विचारात घ्यावी.

**कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडे पाठवू नये. सहकार्य करावे. ही विनंती**

परीक्षा नियंत्रकाकरिता